REGISTERED No. B. 5434

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुले सशक्त होतात

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २७ फेब्रुवारी १९४६ अंक ९




## सारस्वत
### को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
[ स्थापना १९१८ ]
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
टे. नं. ३१६७५ ३१-१-१९४६

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,०४,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. १,७३,००० |
| ठेवी ... | रु. ५५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ६१,००,००० |

सभासदांना जॉईंट स्टॉक कंपन्यांच्या शेअरवर सवलतीच्या दरानें कर्ज, ओव्हरड्राफ्ट, अगर कॅश क्रेडिट देण्यांत येतें.

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा—

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब-ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )







## —: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसही पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

# विविध माहिती

### अहमदाबाद गिरणीकामगारांना बोनस

अहमदाबाद येथील गिरण्यांतील कामगारांस १९४५ सालीं जेवढी मजुरी मिळाली, त्यां रकमेच्या २०% इतका बोनस कामगारांस द्यावा असा ठराव गिरणी मालकांच्या व मजूर महाजनमध्यें झाला आहे.

### सैन्यांतील स्त्री-शाखेंतील अधिकारी

१२ फेब्रुवारी १९४६ ला सैन्यांतील स्त्री-शाखेंतील अधिकारी स्त्रियांची जातवारी पुढील-प्रमाणें होतीः—ब्रिटिश ५०९, हिंदी ८७, अँग्लो-इंडियन १५९, इतर २७. नाविक सैन्यांत याच तारखेस पुढीलप्रमाणें स्त्री–अधिकारी होतेः—ब्रिटिश ११७, हिंदी ६५, अँग्लो-इंडिअन्स ३७, इतर ३५.

### आस्ट्रेलिया व हिंदुस्थान ह्यांमधील व्यापार

आस्ट्रेलिआमधून हिंदुस्थान वगैरे देशांत तयार माल निर्यात करण्यासाठी स्थापन झालेल्या एका संस्थेचे प्रमुख सर बर्ट्रम स्टीव्हन्स हे हिंदुस्थानांत आले आहेत. ते हिंदुस्थान सरकार व हिंदी व्यापारी ह्यांचेशीं हिंदुस्थान व आस्ट्रेलिआ यांच्या दरम्यान व्यापारवृद्धि कशी होईल याबद्दल विचारविनिमय करणार आहेत.

### फ्रान्स परदेशांतून कामकरी आणणार

फ्रान्स देशाची लोकसंख्या घटल्यामुळें फ्रेंच सरकार परदेशांतून २० ते ३० लक्ष कामकरी आयात करणार आहे. या कामकरी वर्गांत बहुतेक भरणा इटली देशांतील कामगारांचा असेल. सात लक्ष जर्मन युद्धकैद्यांपैकीं पांच लक्ष जर्मन युद्धकैदी मजूर म्हणून आज फ्रान्समध्यें काम करीत आहेतच.

### हिंदी व्यंग चित्रपट

वॉल्ट डिसने या प्रख्यात इंग्रिश व्यंग बोलचित्रपटाचें ध्वनीकरण हिंदी भाषेंत हिंदी स्टुडिओंत करण्यांत येणार आहे. पहिला व्यंग बोल चित्रपट बाम्बी हा बहुरंगी तयार होत आहे. या कामासाठी वाल्ट डिसने स्टुडिओंतील मि. जॉन कटिंग मे महिन्यांत हिंदुस्थानांत येत आहेत.

### मोटारी, ग्रामोफोन व मोजे

१९४५ च्या पहिल्या नऊ महिन्यांत ग्रेट ब्रिटननें फक्त २६२ मोटार गाड्यांची निर्गत केली. १९३८ सालीं तत्सम मुदतींत ३३,००० मोटार गाड्यांची निर्गत झाली होती. १९३८ सालीं पहिल्या नऊ महीनांत ग्रेट ब्रिटननें ३१,००० ग्रामोफोन परदेशीं धाडले होते; १९४५ च्या पहिल्या नऊ महिन्यांत फक्त ९० ग्रामोफोन्स निर्गत झाले. रेशमी मोज्यांचे बाबतींतहि तसेच आकडे आहेत. १९३८ मधील ६३,००० मोज्यांचे मानानें १९४५ मधील १३ मोज्यांची निर्गत कितीतरी अल्प आहे.

### जर्मन खाणींचा ब्रिटिश ताबा

ब्रिटिश व्याप्त जर्मनीमधील कोळशाच्या सर्व खाणींचा ताबा ग्रेट ब्रिटननें घेतला आहे. खाणींच्या मूळ जर्मन मालकांस कांहींहि नुकसानभरपाई मिळणार नाहीं.

### कलकत्त्यांत मोटारी तयार होणार

इंग्लंडमधील न्यूफिल्ड या मोटारीच्या कारखानदाराकडे कलकत्त्यांतून ७,५०,००० पौंड किंमतीच्या मोटारी तयार करण्यास लागणाऱ्या यंत्रांची मागणी करण्यांत आली आहे. ही यंत्रसामुग्री आल्यानंतर मोटारी तयार करण्याचा कारखाना कलकत्त्यास उघडण्यांत येईल. या कारखान्यांत 'हिंदुस्थान १०' या नांवानें ओळखली जाणारी मोटारगाडी तयार करण्यांत येईल. कारखान्यांत सर्व मजूर हिंदीच असतील.

### जर्मनीमधील रेकॉर्डिंगची प्रगति

जर्मनीमधील नभोवाणी केंद्राचा संयुक्त राष्ट्रांनीं ताबा घेतला, तेव्हां तेथील यंत्रसामुग्री व ध्वनिमुद्रणाची पद्धति हीं अमेरिका किंवा इंग्लंड ह्यांचे मानानें फार पुढारलेली होती, असें आढळून आलें. मॅग्नेटोफोनमधील एक योजना दर सेकंदास १५,००० सायकल्स ह्या वेगाचा ध्वनि पकडूं शकते. साधारणतः चांगला रेडिओ सेकंदास फक्त १०,००० सायकल्स इतका ध्वनि उमटवूं शकतो; त्यामुळें रेकॉर्डिंगची ही योजना फारच उत्कृष्ट आहे. रिबनमधील चुका, अडथळे, तुटक शब्द, व.वर्ये इत्यादि एका कात्रीनें कापून टाकून रिबन एका विशिष्ट डिंकानें पुनः जोडतां येते व रेकॉर्डिंग तयार होतें.

### प्रे. ट्रूमन ह्यांचा भाषणें सुधारण्याचा प्रयत्न

रेडिओवरील भाषणाचा आपला आवाज सुधारावा, ह्यासाठीं प्रेसिडेंट ट्रूमन हे प्रयत्न करीत असतात. रेडिओवर भाषण करण्यापूर्वी रेडिओतज्ञाकडून ते आपल्या चुका सुधारून घेतात. त्यांनीं एक लहानसा रेकॉर्डिंग व ट्रॅन्स्क्रिप्शन सेट तयार करवून घेतला आहे. त्यामुळें, स्वतःचें भाषण ते स्वतः ऐकून चुका दुरुस्त करूं शकतात.

### ऑस्ट्रेलियांतील मूळ रहिवासी

ऑस्ट्रेलिअन गोऱ्या रहिवाश्यांना असणारे सर्व नागरी हक्क आस्ट्रेलिआंतील मूळ रहिवाश्यांना देण्यांत यावेत असा ठराव आस्ट्रेलिआंतील मूळ रहिवासी व त्यांना मदत करणाऱ्या गोऱ्यांच्या सभेंत पास झाला. या हक्कांमध्यें पार्लमेंटमध्यें बसण्याचा हक्कहि मागण्यांत आला आहे.

### टाटा त्रैमासिक

हिंदुस्थानांत मिळण्यास कठीण अशा विश्वासार्ह आर्थिक माहितीनें भरलेलें असें एक त्रैमासिक टाटा अँड सन्स प्रसिद्ध करूं लागले आहेत. हे त्रैमासिक खाजगी प्रसिद्धीकरितां असून त्यांत थोडक्यांत हिंदुस्थानांतील आर्थिक घडामोडींबद्दल विवेचन असतें. प्रसिद्ध झालेल्या पहिल्या अंकांत डिसेंबर १९४५ अखेरच्या तिमाहींतील घाऊक भावांचा चढउतार, औद्योगिक उत्पादन, राहणीचा खर्च, नाणेबाजार व सरकारी रोखे ह्याबद्दल माहिती आहे. या अंकामध्यें अत्यंत उपयुक्त अशी आकडेवार माहिती असून चढउतार दर्शविणारे तक्तेहि दिले आहेत.





पद्मनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा

सांडू प्रेगयुटेरो
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड. (चेंबूर, मुंबई)
पुणें चीफ एजंट्सः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.

छत्रे यांचा -कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालकः—एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड
फो. नं. ३३८४९ ] मुंबई ४.

झापकर टेलरिंग कॉलेज
दादर, मुंबई १४.
माहिती मोफत मागवा

# ऋणविमोचन कायद्याखाली द्यावयाचीं नवीन कर्जें

मुंबई ऋण-विमोचन कायदा सन १९३८ सालीं मुंबई विधिमंडळांत पास होऊन त्याची अंमलबजावणी इलाख्यांतील कांहीं तालुक्यांत प्रयोगादाखल सुरू झाली. परंतु त्याचा अनुभव तपशीलवार असा उपलब्ध नाहीं. सन १९४५ सालामध्यें मुंबई सरकारनें हा कायदा इलाख्यांतील बऱ्याच तालुक्यांना लागू केला आहे व त्यामुळें या कायद्याकडे सहकारी खातें, मध्यवर्ती बँका व सोसायट्या यांचें लक्ष वेधलें गेलें. आतां इलाख्यांतील सुमारें ९१ तालुक्यांना हा कायदा लागू झाला असून या कायद्याप्रमाणें द्यावयाचे कर्जासंबंधी सहकारी खातें व बँकांचे प्रतिनिधी यांजबरोबर वाटाघाट होऊन धोरण ठरविण्यांत येत आहे.

या कायद्यामुळें आतां ज्या सभासदानें आपण स्वत: अगर त्याचे धनको यानें बोर्डाकडे अर्ज केला असेल त्यास जमिनीचे तारणावर कर्ज देतां येणार नसून त्यास फक्त पिकाचे तारणावर कर्ज देतां येईल. ज्या सोसायटीचे सभासदानें बोर्डाकडे अर्ज दिला असेल त्यास वर नमूद केल्याप्रमाणें पिकाचे तारणावर कर्ज मिळेल. परंतु जे सोसायटीचे सभासद नाहींत अशांना कर्ज सोसायटीनें नाममात्र सभासद करून घेऊन द्यावें. परंतु अशा व्यक्तींना सभासद करून घेण्याची सक्ति करण्यांत येणार नाहीं. ज्या ठिकाणीं सोसायटी सभासद करून घेण्यास तयार नसेल अगर सोसायटी अस्तित्वांत नसेल अशा ठिकाणीं नवीन सोसायटी काढण्यांत येईल अगर मध्यवर्ती बँकेनें अशा व्यक्तींना नाममात्र सभासद करून घेऊन कर्ज परस्पर देण्यास हरकत नाहीं.

पिकाचे तारणावर कर्ज देणें थोडेंफार धोक्याचें आहे याची जाणीव सहकारी खात्यास आहे. पिकाचे तारणावर द्यावयाचें कर्ज व शेतीच्या मालाची विक्री याबाबत विशिष्ट देखरेख करावी लागेल व त्यासाठी सहकारी खातें व बँका यांना जादा नोकरवर्ग नेमावा लागेल. सरकारनें सोसायट्यांचे देखरेखीवरील खर्चाची जबाबदारी सर्वस्वी आपलेवर घेतली असून यापुढें सोसायट्या अगर मध्यवर्ती बँका यांना आजतागायत द्यावी लागणारी देखरेखीची वर्गणी द्यावी लागणार नाहीं.

पिकाचे तारणावरील कर्ज अल्प मुदतीचें असल्यामुळें व्याजाचा दर कमी असावा अशी योजना आहे. मध्यवर्ती बँकेनें सोसायटीस हें कर्ज द. सा. द. शे. साडेचार टक्के पेक्षा जास्त दरानें द्यावयाचें नाहीं व सोसायटीनें जास्तींत जास्त रु. ७-१३-० या दरापेक्षां जास्त व्याज सभासदांकडून घ्यावयाचें नाहीं.

पिकाचे तारणावरील कर्जाची परिस्थिति लक्षांत घेतां त्यांत येणारें नुकसानीसाठी सरकार एकूण कर्जाच्या रकमेच्या ५ टक्के मदत देणार आहे व यासाठी सोसायट्या व बँका यांना निराळे हिशेब ठेवावे लागणार आहेत. त्याचप्रमाणें कर्जमागणीची कमाल मर्यादा पत्रकें वगैरेही निराळीं तयार करावीं लागतील.

पिकाचे तारणावर एकरीं निरनिराळया पिकासाठी जास्तींत जास्त कर्ज किती द्यावें हें त्या त्या जिल्ह्याचे कलेक्टर यांनीं ठरवावयाचें आहे. या ऋण-विमोचन कायद्याखालीं पुढील कांहीं वर्षांत कदाचित सहकारी चळवळीचें स्वरूप बदलेल किंवा काय असा प्रश्न उभा राहणें शक्य आहे. मुंबई येथें सन १९४५ साली सहकारी बँकांची एक परिषद् झाली. या कायद्यामुळें येणारी जबाबदारी लक्षांत घेतां सरकारनें शेती मालाचे भाव निश्चित करणें, त्याचप्रमाणें जकातविषयक धोरण ठरविणें, अडचणीचे वेळीं सरकारनें मध्यवर्ती बँकांना मदतीचें आश्वासन देणें व त्याचप्रमाणें आज देण्यांत यावयाची ५ टक्के नुकसानभरपाई १० टक्के तरी करणें, ह्याबाबत प्रस्तुत परिषदेंत महत्त्वाचे ठराव पास झाले. या ठरावांवर सरकारकडून अद्याप उत्तर आलें असल्याचें दिसत नाहीं.

ऋण-विमोचन कायद्यामुळें शेतकरी लोकांना त्यांच्या इतर संसारोपयोगी कामासाठी यापुढें कर्ज मिळणें कठीण होऊन बसलें आहे. या कायद्याखाली द्यावयाचीं कर्जें पिकाचे तारणावर आहेत. शेतामध्यें तयार होणारा माल खरेदी-विक्री संघ अगर अधिकृत विक्रेते यांचेशिवाय इतरांमार्फत विकतां यावयाचा नाहीं असा दंडक कायद्यांत आहे, परंतु त्याची अंमलबजावणी कोणीं व कशी करावयाची हा प्रश्न आहे. आज असें सांगण्यांत येत आहे कीं, सरकार लेव्ही पद्धतीनें धान्य खरेदी करीत आहे त्यामुळें अडचण नाहीं, परंतु सरकार अशा शेतकऱ्यांची धान्यविक्रीची किंमत परस्पर सोसायटी अगर बँक यांजकडे देईल किंवा कसें हा प्रश्न महत्त्वाचा आहे. गेल्या ३।४ वर्षांत ज्या सोसायट्यांकडे सभासदांची थकबाकी आहे त्यांची रकम सोसायटीकडे देण्याबद्दल प्रयत्न करण्यांत आला. परंतु त्यांत यश आलेलें नाहीं.

मध्यवर्ती बँकांच्या दृष्टीनें महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, पिकाचे तारणावरील कर्ज जरी अल्प मुदतीचें असलें तरी त्या मानानें तारण कमी सुरक्षित व त्यांत येणारें नुकसान सरकारचे अंदाजापेक्षा कदाचित जास्त येईल. वसुलीचा मागील अनुभव लक्षांत घेतां वसुलीचें काम जिकीरीचें होईल व सोसायट्यांना लायक नोकर वर्ग न मिळाल्यास हिशेबाचें काम चोख राहण्यास अडचणी येतील. परंतु, ह्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न बँकांनीं केला पाहिजे, हें उघड आहे.

## सहकारी संस्था व उभ्या पिकावर कर्ज

मुंबई सरकार मुंबई सहकारी संस्थांचा १९२५ चा कायदा सुधारणार आहे, त्याचा मसुदा मुंबई सरकारनें २७ डिसेंबरच्या आपल्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध केला असून त्यावर कोणास हरकत घ्यावयाची असल्यास अथवा सुधारणा सुचविण्याच्या असल्यास २८ फेब्रुवारीच्या आंत पाठविण्याची सूचना केली आहे. शेतकऱ्यांचा कर्जनिवारण कायदा इलाख्याच्या बऱ्याच जिल्ह्यांत लागू झाला असून त्याचा फायदा घेऊन जे शेतकरी कर्जमुक्त होतील त्यांच्या उभ्या पिकासाठी लागणारें कर्ज सहकारी संस्था अथवा बँका यांना पुरवावें लागेल तेव्हां या बाबतींत सरकारला व सहकारी संस्थांना येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या हेतूनें हा कायदा सुधारण्यांत येत आहे.

## युरोपिअनांची नोकरींत भरती.

आय. सी. एस. व पोलीस खात्यांत होणारी युरोपिअनांची भरती थांबविण्यासाठीं मध्य विधिमंडळानें पास केलेल्या तहकुबीच्या ठरावाची कां दखल घेतां येत नाहीं याचीं स्टेट सेक्रेटरीच्या वतीनें पुढील कारणें देण्यांत आलीं. (१) युद्धोत्तरकाळींहि ५० टक्के जागा युरोपिअनांना देण्यांत येतील असें आश्वासन आधींच दिलें आहे तें मोडणें योग्य नाहीं. (२) या भरतीच्या अटी आधींच स्पष्ट केल्या होत्या. (३) नवीन सरकार येईल तेव्हां तें हवी तशी भरती करीलच. पण मध्यंतरींच्या काळांतल्या जागा ह्या भरल्याच पाहिजेत. या जागा भरण्यापूर्वी सेक्रेटरी ऑफ स्टेटनीं गव्हर्नर जनरलची संमति मिळविली होती.

# सहकारी कायद्यांतील महत्त्वाच्या दुरुस्त्या

( लेखक:—रावसाहेब य. द. खोले, एल. एस. जी. डी., चेअरमन, पुणें सें. को. बँक लि. )

मुंबई सरकारनें सन १९२५ च्या सहकारी कायद्यामध्यें कांहीं दुरुस्त्या सुचविणारें एक बिल तयार केलें असून तें सरकारी गॅझेट-मध्यें प्रसिद्ध केलें आहे.

सन १९२५ च्या कायद्याचें कलम ५ यांत दुरुस्ती सुचवून सोसायटी नियमित अगर अनियमित जबाबदारीची म्हणून नोंदविणें या नवीन कायद्यामुळें शक्य होणार आहे व जी सोसायटी अनियमित जबाबदारीची म्हणून नोंदविली आहे व ज्या सोसायटीनें आपली जबाबदारी नियमित म्हणून बदलून घेतली नाहीं अशा सोसायट्यांबाबत ती सोसायटी रद्द झालेवर त्या सोसायटीचें देणें-घेणेबद्दल सर्व सभासद सामुदाईक व व्यक्तिशः जबाबदार राहतील असें सुचविलें आहे.

सध्या अनियमित म्हणून नोंदलेल्या सोसायट्यांना ठराव करून ही जबाबदारी नियमित म्हणून बदलण्याची सवलत नवीन कायद्यामुळें मिळणार आहे. मात्र अशी जबाबदारी बदलण्यापूर्वी सोसायटीनें मे. रजिस्ट्रार यांची अगाऊ संमति व आपल्या धनको सभासद व कर्ज देणाऱ्या संस्थेस नोटीस देऊन त्यांना आपल्या भागाचे पैसे, ठेवी व कर्ज परत घेण्याची मुभा ठेवून अनियमितीची नियमित जबाबदारी बदलण्यास हरकत नाहीं व अशा तऱ्हेचें सर्व देणें देऊन नंतर ही जबाबदारी अंमलांत येईल.

सहकारी कायद्याचें कलम १६ यांत दुरुस्ती सुचवून जर एकादेवेळीं मे. रजिस्ट्रारसाहेब यांना सोसायटीचे हिताचे दृष्टीनें एकादा पोटनियम सोसायटीनें स्वीकारणें इष्ट आहे असें वाटल्यास तो नियम स्वीकारण्याबद्दल सोसायटीस सूचना देतां येईल व सोसायटीनें जर पोटनियम स्वीकारला नाहीं तरी तो नियम म्हणून पोटनियमांत दाखल म्हणून करण्याची तजवीज नवीन कायद्यामुळें होणार आहे.

या नवीन दुरुस्त्या सुचवितांना सरकारी धोरण असें आहे कीं, ऋण विमोचन कायद्याखाली यापुढें लागणारें कर्ज मुख्यत: अशा सभासदांना यावें लागणार आहे कीं त्यांना तारण देण्यास जिंदगी नाहीं व आजपर्यंत मोठे खातेदार अनियमित जबाबदारी-मुळें सहकारी चळवळीमध्यें येऊं शकले नाहींत.

सोसायट्यांची जबाबदारी नियमित असावी कीं अनियमित असावी ह्या प्रश्नासंबंधीं सन १९४४ सालीं मुंबई प्रांतिक सहकारी परिषदेमध्यें चर्चा होऊन हा प्रश्न विचारासाठीं एका पोट समिती-कडे सोपविलेला होता. मुंबई इलाख्यांत सन १९४२-४३ सालीं एकूण अनियमित जबाबदारीच्या संस्था ३,८२४ होत्या व त्यांचें एकूण खेळतें भांडवल रु. ३,११,३७,३२८, होतें व त्याची वर्गवारी पुढीलप्रमाणें होती:—

| | रु. |
|---|---|
| सभासदांचे भाग | ४१,८४,१०७. |
| गंगाजळी ठेव | ९३,७३,६९४. |
| ठेवी | २१,२९,७१४. |
| मध्यवर्ती बँकांकडून घेतलेलें कर्ज | १,१२,५२,४९२ |

सोसायट्यांना, ज्या नियमित जबाबदारीच्या असतील त्यांना मध्यवर्ती बँकांकडून मिळणारें कर्ज फक्त भागांची रकम व इतर फंडाइतकेंच मिळेल व सोसायटीच्या कारभारासाठी लागणारी रक्कम ठेवीचे रूपानें उभारावी लागेल. अनियमित जबाबदारीची अंमलबजावणी आजपर्यंत झाली नाहीं. सोसायट्यांच्या कारभाराचे दृष्टीनें नियमीत जबाबदारी अडचणीची होईल व मध्यवर्ती बँकांना यापुढें सोसायट्यांचें कर्ज प्रकरणीं नवीन धोरण आखावें लागेल. नवीन बिलामुळें मे. रजिस्ट्रारसाहेब यांना पोटनियमाबद्दल जे अधिकार मिळणार आहेत ते लोकशाही तत्त्वास प्रतिकूल असे आहेत. हें खरें कीं ज्या सोसायट्या आपल्या कारभारांत दुर्लक्ष करीत असून कारभार सुधारीत नाहींत त्यांचेबाबत सुधारणा करण्यास वाव असावा. परंतु प्रस्तुत बिलांत कोणत्या विशिष्ट बाबीबद्दल हा अधिकार वापरयाचा आहे याचा खुलासा नाहीं व शिवाय असा अधिकार वापरण्यापूर्वी निमसरकारी संस्थेस अगर मध्यवर्ती संस्थेस याबाबत लिहून व त्यांचें मत अजमावून मग निर्णय घेणें सयुक्तिक होईल. सहकारी कार्यकर्त्यांची मागणी अशी कीं चळवळीवरील दुहेरी नियंत्रण काढून तीं केवळ निमसरकारी लोकांचे हातीं असावी. अशी मागणी असतांना प्रस्तुतचें बिल तत्त्वत: प्रतिगामी असें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

## भोर स्टेट बँक लि, भोर

( वार्षिक सभा : ता. १०-३-४६)

वरील बँकेनें १९४५ सालीं उत्कृष्ट प्रगति केली आहे. तिचेकडील ठेवी २ लक्ष रुपयांच्या ८ लक्ष रुपयांवर गेल्या व खेळतें भांडवल १० लाखांवर गेलें. कर्जे फक्त ४०२ रुपयांचीं होतीं; आतां तीं ३ लक्ष, ३७ हजार रुपयांचीं झालीं आहेत. सहाजिकच बँकेचा व्यवहार किफायतशीर होऊन १९४५ सालीं तिला ६,१६२ रुपये नफा उरला. त्यांतून २,००० रुपये गंगाजळींत टाकण्यांत येतील व मागील वर्षांच्या ताळेबंदांतील जिंदगीकडील खर्चाची ३,९२८ रुपयांची रकम वजा करून उरलेले २३४ रुपये पुढील वर्षांत ओढण्यांत येतील. भोर दरबारनें एकूण खपलेल्या भरपाई भांडवलावर पांच वर्षेपर्यंत ३% व्याजाची हमी घेतली आहे, त्याप्रमाणें भागीदारांस डिव्हिडंड मिळेल. कठीण युद्धजन्य परिस्थिति व स्थानिक प्लेगमुळें भोर येथील मंदावलेला व्यापार हीं लक्षांत घेतां बँकेच्या व्यवहाराची प्रगति फारच समाधानकारक आढळेल. ता. १५ मार्च १९४५ रोजीं बँकेनें पाली ( ता. सुधागड, भोर स्टेट ) येथें एक शाखा उघडली असून तिचें काम ठीक चाललें आहे.

नाणेघाट फ्युनिक्युलर ट्राम्वे अ‍ॅण्ड ट्रान्सपोर्ट कं. लि., पुणें

वरील कंपनीचें प्रसिद्धीपत्रक "अर्था" चे ता. २० चे अंकांत प्रसिद्ध झालें, त्यांतील संचालक मंडळाचे यादींतून

श्री. श्रीपाद प्रभाकर ओगले

ग्लास मॅन्युफॅक्चरर,

मॅनेजिंग एजंट—ओगले ग्लास वर्क्स लि.

हें नांव चुकीनें वगळलें गेलें आहे. श्री. ओगले हेहि कंपनीचे एक संचालक आहेत.

## घरभाडेकऱ्यांच्या संघटनेचें महत्व

### युद्धकाळांतील जागृति कायम ठेवा

( लेखकः—श्री. श्री. वि. गाडगीळ, एम्. ए., एलएल्. बी., अध्यक्ष, पुणें घरभाडेकरी संघ )

युद्धाचा शेवट झाल्याबरोबर सध्या लागू असलेला मुंबई सरकारचा १९४४ सालचा ७ वा कायदा रद्द होईल व आपल्यास पूर्वीप्रमाणें मनसोक्त भाडेकऱ्यांवर सत्ता गाजवितां येईल अशीं सुखस्वप्नें बऱ्याच घरमालकांना पडूं लागलीं आहेत व पुष्कळ भाडेकऱ्यांना असें वाटूं लागलें आहे कीं, आतां हा कायदा रद्द झाल्यास आपल्यास भाडेकरीसंघ चालूं ठेवण्याची गरज नाहीं. परंतु ह्या दोघांच्याही कल्पना अवास्तव व वस्तुस्थितीच्या विरुद्ध आहेत.

### संघाची उपयुक्तता

पुणें घरभाडेकरी संघाची स्थापना १९४४ मध्यें झाली व गेलीं २वर्षे या संघानें घरमालक व भाडेकरी यांच्या संबंधांबाबत बरीच जागृति पुण्याच्या रहिवाशांमध्यें उत्पन्न केली. संघाची स्थापना जरी युद्धकाळांतल्या निकडीच्या परिस्थितीमुळें झाली असली तरी जसजसें संघाचें काम चालू झालें तसतशी या संघाची जरूरी पुण्यासारख्या लाखो लोकांच्या वस्तींत कायमची आहे व त्यांत अनेक प्रश्नांचा परामर्ष घेतां येण्याजोगा आहे असें आढळून येऊं लागलें. पुण्यांतील जनता या बाबतींत पूर्वी अगदींच उदासीन होती व त्यामुळें १९३९ मध्यें मुंबई सरकारनें मुंबई भाडें नियंत्रण कायदा तयार करून त्याची व्याप्ति मुंबईबाहेर फक्त अहमदाबादला तेवढीच केली असतां पुण्याच्या नागरिकांनीं त्याकडे लक्ष दिलें नाहीं व त्यामुळें त्या कायद्याचा फायदा आम्हांस मिळाला नाहीं. वास्तविक मुंबई इलाख्यांत मुंबईच्या खालोखाल हा भाडेकऱ्यांचा प्रश्न पुणें शहरांत फार मोठ्या अडचणीचा होता. त्यावेळीं जरी आपल्याकडून याबाबत दुर्लक्ष झालें असलें तरी आतां एकदां आपल्यास याचा फायदा मिळाला असतां आपण तो आपल्या निष्काळजीपणानें घालवितां उपयोगी नाहीं व कोणत्या ना कोणत्या परिस्थितींत भाडेकऱ्यांचें रक्षण करण्यासाठी भाडेकरी संघाचें बळ वाढवून तसे कायदे करून घेतले पाहिजेत. आपल्या सर्वांच्या सुदैवानें पुनः लोकशाही राजवट सुरू होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. त्यांत आपल्यास सोईस्कर असे कायदे करून घेण्याची जबाबदारी सर्वसाधारण जनतेवर पडते व आपली गाऱ्हाणीं वेशीवर मांडण्याचें कर्तव्य त्यांनीं पार पाडावयास पाहिजे.

### पाणी व वीज ह्यासंबंधीं जाच

भाडेकऱ्याला घरांतून हुसकून लावण्याचे रामबाण उपाय म्हणून मालक लोक त्यांचे पाण्याचा व विजेचा पुरवठाच बंद करून त्यांचा कोंडमारा करीत. या स्वरूपाच्या तक्रारी पुणें संघाकडे अनेक आल्या. त्यावर खात्रीचा असा उपाय सांपडत नव्हता. त्यांतल्या त्यांत विजेच्या पुरवठ्याबाबत फार हाल होऊं लागले. वीज असल्यामुळें रेशनिंग ॲथॉरिटीकडून रॉकेल मिळेना व मालकाच्या मनांत नसल्यामुळें वीज मिळेना. बरें विजेचा पुरवठा बंद करणें हा इं. पी. कोडप्रमाणें गुन्हा होतो कीं नाहीं हा प्रश्न अनिर्णीत राहिलेला. येथील कांहीं मॅजिस्ट्रेटनीं घरमालकांना वीज पुरवठा तोडलेला असतांही सोडून दिलें. अशा परिस्थितींत या भाडेकऱ्यांची मोठी केविलवाणी स्थिति झाली. त्यावर उपाययोजनेचा विचार करतां, सुरत व अहमदाबादच्या कलेक्टरांनीं मालकांच्या या जुलुमाविरुद्ध भारतसंरक्षण कायद्याचा अवलंब केल्याचें वाचनांत आलें. त्याबरोबर संघानें येथील कलेक्टरांना त्याप्रमाणें लिहिलें व हल्लीचे मे. कलेक्टरसाहेबांनीं अत्यंत त्वरेनें त्याकडे लक्ष देऊन भारतसंरक्षण कायद्याखालीं एक हुकूम प्रसिद्ध केला व त्याची एक प्रत आमच्या संघाकडे पाठवून दिली. या हुकुमाचा योग्य तो उपयोग होऊन गरीब भाडेकऱ्यांचे हाल बरेच कमी झाले.

### म्युनिसिपल निवडणूक

भाडेकऱ्यांचे व नगरपालिकेचे अन्योन्यसंबंध फार जवळचे आहेत. या शहरांतील लोकसंख्येपैकीं शें. ९० लोक हे भाडेकरी आहेत व नगरपालिकेंत निवडून येण्याची पात्रता हीही भाड्याचीच आहे. कोणाही महिन्याला १ रुपया भाडें देणाऱ्यास मत देण्याचा अधिकार आहे. भाडेकऱ्यांना वास्तविक नगरपालिकेंत फार मोठ्या प्रमाणांत वावरावयास मिळावयास हवें. परंतु वस्तुस्थिति मात्र अगदीं उलट आहे. नगरपालिकेंतील मान्यवर सभासदांच्या ६० जागांपैकीं जेमतेम १० जागा भाडेकऱ्यांच्या वांट्यास येतात व बाकीच्या सर्व घरमालक पटकावून बसतात. त्यामुळें पुष्कळदां अनागोंदी स्वरूपाचा कारभार चालतांना आढळतो.

### डागडुजी व साफ-सफाई

घरांची डागडुजी, साफसफाई व रंगसफेती ही घरमालकांनीं निदान वर्षांतून एकवेळ तरी करावयास पाहिजे व त्याकरता नगरपालिका २ महिन्यांच्या भाड्याची रक्कम कर आकारणींतून सोडून देते परंतु जी रक्कम घरमालकांना वरील खर्चासाठी माफ केली जाते त्या रकमेचा विनियोग त्या कामासाठीं होतो कीं नाहीं हें मात्र कोणीच जबाबदारीनें पाहात नाहीं. त्यामुळें शहरांतील घरें हीं प्रेक्षणीय तर नाहींतच पण मनाला हवा-उजेडानें आल्हाद देणारींही नाहींत. नवीन नवीन घरें हजारो रुपये खर्चून बांधलीं जात आहेत; परंतु त्यांतही सौंदर्य व सुखसोई नगरपालिकेकडून कटाक्षानें पाहिल्या जात नाहींत. त्याबाबत प्लॅनची छाननी करतांना नगरपालिका फक्त रस्तेरुंदीची बाब तेवढीच पाहते. बाकीच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करते. दिवसेंदिवस केवळ भाड्याचें उत्पन्न करण्याकरतां बांधल्या जाणाऱ्या इमारती शहरांत जास्त होणार आहेत. अशीं घरें कशीं बांधावींत यासंबंधांत नगरपालिकेनें आग्रह धरला पाहिजे व सोईस्कर व सुंदर ब्लॉक्सची बांधणी करून घेतली पाहिजे. लोकसंख्येच्या वाढीबरोबर, पाणी, ड्रेनेज व साफसफाई यांचे प्रश्न एकंदर शहराच्या आरोग्याच्या दृष्टीनें महत्त्वाचे झाले आहेत व त्यांच्याबाबत नगरपालिकेकडून अक्षम्य अशी हेळसांड होत आहे. तसेंच साथीचे रोग नवीन नवीन उत्पन्न होत आहेत. ही परिस्थिति प्रत्येकानें प्रयत्न केल्यास थोडीफार सुधारेल. परंतु सामुदायिक रीतीनें तिचा परामर्ष घेतल्याखेरीज हल्लीच्या सुधारलेल्या नागरी जीवनांत इलाज नाहीं.

### विजेची सक्ती

पुण्यासारख्या मुंबई इलाख्यांतील दुसऱ्या क्रमाच्या शहरांत अजून हजारों घरें विजेशिवाय असावींत ही गोष्ट सांगूनही पटण्याजोगी नाहीं. हा मागासलेपणा मालकांच्या जुनाट व आडमुठेपणामुळें सोसण्याची पाळी भाडेकऱ्यांवर येते. सक्तीच्या शिक्षणासारखी सक्तीची वीज पुण्यांतील प्रत्येक घरांत यावयास पाहिजे व त्याकरतां घरमालकांच्या संमतीची अडचण येत असल्यास ती संमतीच अनावश्यक करून टाकली पाहिजे. भाडेकरी स्वतःचे पैशानें वीज घेण्यास तयार असतो. केवळ घरमालकांनीं त्यास संमति दिली नाहीं म्हणून अनेक घरें विजेशिवाय राहिलीं आहेत. या व अशा प्रकारच्या अनेक सोईगैरसोयींचा विचार दिवसेंदिवस जागरूकपणें व नियमितपणें व्हावयास पाहिजे असल्यास ठिकठिकाणीं भाडेकऱ्यांच्या परिषदा वारंवार भरावयास मिळाल्या पाहिजेत.

## बेलापूर रोड येथें सहकारी तत्त्वावर नवीन साखर कारखाना ?

बेलापूर रोड येथें डेक्कन कॅनॉल्सवरील बागायतदारांची परिषद ता. १७।१२।१९४५ रोजीं भरली होती. त्या परिषदेंत एका ठरावान्वयें सहकारी तत्त्वावर एक साखर कारखाना चालविण्याचें ठरलें आहे. त्याची पूर्वतयारीही पण जोरांत चालू आहे.

महाराष्ट्रांतील पाटाखालीं भिजणारा हाच महत्त्वाचा भाग आहे. सध्यां येथें निरनिराळे चार साखरकारखाने असून त्यासाठीं उसाच्या क्षेत्राची व लागणाऱ्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था सरकारकडून केली गेली आहे. लहान प्रमाणावर केलेली शेती आर्थिक दृष्ट्या फायदेशीर होत नाहीं हें आतां नुसतें सिद्धच नव्हे तर लोकांना पूर्ण कळून चुकलें आहे आणि म्हणूनच पाटाची पाणीपट्टीसुद्धां वसूल होत नाहीं, या सबबीवर सरकारनें पूर्वी आपलें उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीनें साखर कारखानदारांना उत्तेजन देण्यासाठीं अनेक सवलती दिल्या. कारखानदारांनीं अर्थातच या सवलतींचा फायदा पुरेपूर घेतला व लहान लहान शेतकऱ्यांच्या सर्व जमिनी लांब मुदतीनें खंडाने घेतल्या आणि ओघानेच लहान शेतकरी हा मजूर–शेतकरी बनला व त्याबरोबरच शेती–मालाच्या किंमतींतील तेजी-मंदीचा फायदा त्यास मिळेनासा झाला.

युद्धकाळांत शेतीचे मालाचे किंमतींत भरमसाट वाढ झाल्यामुळें स्थानिक कारखानदार व व्यापारी वगैरे लोकांजवळ भरपूर पैसा सांठलेला आहे. साखर धंद्याबाबत सरकारच्या सध्याच्या अनुकूल धोरणाचा फायदा घेण्याच्या दृष्टीनें त्या लोकांनीं आपल्या सांठलेल्या पैशांचा उपयोग परत साखरेच्या उत्पादनासाठींच करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांत आश्चर्य वाटण्याजोगें कांहींच नाहीं.

परंतु भांडवलाच्या सहाय्यानें भांडवलदार ज्या गोष्टी करूं शकतो, त्याच गोष्टी सहकारी तत्त्वावर एकत्र येऊन आर्थिक दृष्ट्या गरीब असे लोक सुद्धां भांडवलाशिवाय असून न रहातां तितक्याच कार्यक्षमतेनें करूं शकतात हें सोदाहरण पटवून देण्याच्या दृष्टीनें अशा तऱ्हेचा कारखाना निघणें जरूर आहे व तशा तऱ्हेचे प्रयत्न केव्हांही प्रशंसनीयच ठरतील. पूर्वी असाच एक साखर कारखाना काढतेवेळीं तो 'जॉइंट स्टॉक' पद्धतीवर न काढतां सहकारी पद्धतीनेंच काढावा असें पुष्कळांचें मत होतें.

अशा तऱ्हेचा कारखाना काढण्यानें लहान शेतकऱ्यांना स्वतःचें स्वतंत्र अस्तित्व तर टिकवतां येईलच परंतु साखर कारखान्यांतून होणाऱ्या फायद्याचा विनियोग त्यांचें आर्थिक जीवन अधिक सुखकर करण्याकडे करतां येईल.

अशा तऱ्हेच्या संस्था चालवून मिळालेल्या अनुभवामुळें त्यांचा आत्मविश्वास वाढेल व शेतीधंद्याकडे पहाण्याचा सांप्रतचा दृष्टिकोण बदलून हिंदी शेतींत अद्यावतपणा आणण्याच्या दृष्टीनें त्यांची मदत होईल आणि सहकारी क्षेत्रांत एका उपयुक्त व जरूरीच्या संस्थेची भर पडेल ती निराळीच.

ह. वा. सहस्रबुद्धे

### हिंदुस्थानांतील ब्रिटिश सैनिक

हिंदुस्थानांत यापुढें ब्रिटिश सैनिक किती रहावेत हें हिंदुस्थानचें भावी सरकार ठरवील असें मि. मेसन या युद्ध चिटणिसांनीं विधिमंडळांत सांगितलें. युद्धकाळांत हिंदुस्थानांत २,४६,००० ब्रिटिश, १७०,००० अमेरिकन व ५८,३९३ इतर मित्र राष्ट्रांचे सैनिक होते.

### नामपूर विणकर सहकारी संस्था

ता. २३।१।१९४६ रोजीं रात्रीं ८ वाजतां नामपूर विणकर सहकारी संस्थेचे पंच व विणकर सोसायटींतील प्रमुख पुढारी यांची सभा झाली. सदर प्रसंगीं मे. डी. आर. वाणी सुपरवायझर सटाणा ता. को. सुपरवायझिंग युनियन लि. सटाणा यांनीं संस्थेचे पंच व इतर पुढारी लोक यांचेमध्यें असलेल्या तक्रारी ऐकून घेऊन त्याबद्दल योग्य चौकशी केली. विणकर सहकारी संस्थेचे सेक्रेटरीही यावेळीं समक्ष हजर होते. शेवटीं आपापसांतील खाजगी भांडणें विसरून जाऊन सहकारी संस्थेचा पूर्ण फायदा करून घेण्याचें ठरलें. राजीनाम्यामुळें रिकाम्या झालेल्या जागा भरण्यांत येऊन चेअरमन व व्हॉ. चेअरमन यांचीहि निवड करण्यांत आली. सेक्रेटरीच्या कामकाजाची दिशा समजावून दिली. सदर सदर प्रसंगीं मे. सब-ऑडिटरसाहेब को. सो. सटाणे हेहि हजर होते.

### पारनेर को. क्रे. सोसायटीचा रौप्य महोत्सव

पारनेर ता. बागलाण को. क्रे. सोसायटीस पंचवीस वर्षें पुरीं झाल्यानें सदर सोसायटीचा रौप्य महोत्सव ता. २७।१।१९४६ रोजीं दुपारीं ३ वाजतां मोठ्या उत्साहानें मे. शिवराम जानबा पाटील चेअरमन सटाणा ता. को. सुपर युनियन लि. सटाणा, यांचे अध्यक्षतेखालीं पार पडला. सदर प्रसंगीं मे. डी. ए. पाटील मॅनेजिंग डायरेक्टर सीड सप्लाय ॲण्ड सेल सोसायटी सटाणा, मे. सब ऑडिटर, को. सो. सटाणा व मे. डी. आर. वाणी सुपरवायझर ता. को. सुपरवायझिंग युनियन सटाणा हे व जवळपासच्या सोसायटीचे पुढारी व गांवांतील मंडळी मिळून २०० चे वर लोक हजर होते. आलेल्या पाहुण्यांना सोसायटीनें करून दाखविलेल्या प्रगतीवर व पुढील ध्येय काय असावें यावर समयोचित भाषणें झालीं. सोसायटीच्या पंचवीस वर्षांचा त्रोटक अहवाल तयार करून मे. डी. आर. वाणी सुपरवायझर यांनीं सभेपुढें तपशीलवार रीतीनें समजावून सांगितला. सोसायटीचे पटावर एकूण ३८ सभासद असून सभासदांचें शेअर्स भांडवल रु. ७३५ चें आहे. सोसायटीचा रिझर्व्ह फंड रु. २४३६ आहे. सोसायटीचें कामकाज सोसायटीचे चेअरमन श्री. काळू बारीकराव पाटील यांचे नेतृत्वाखालीं उत्तम चाललें आहे.

### को. सेक्रेटरीज परीक्षा

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटतर्फे घेण्यांत येणाऱ्या को. सेक्रेटरीज परीक्षांचा दिवस सोमवार, ता. २९ एप्रिल १९४६ असा जाहीर झाला आहे. सहकार, सहकारी कायदा व सहकारी हिशेब आणि सेक्रेटरीचें कामकाज ह्या विषयांची परीक्षा उमेदवारांस द्यावी लागेल. परीक्षेची फी ३ रु. आहे. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका स्थानिक भाषांतून काढल्या जातील आणि इन्स्टिट्यूटच्या शिक्षण समितीनें नेमलेले परीक्षक त्या तपासतील. जिल्हा शिक्षण समित्यांनीं परीक्षा घेण्याची सर्व पूर्व तयारी (परीक्षेची जागा, उत्तरें लिहिण्याच्या वह्या, शाई, टिपकागद ह्यांची व्यवस्था) करावयाची आहे. त्याचा खर्च इन्स्टिट्यूट देणार आहे. उमेदवारांची यादी व फी हीं इन्स्टिट्यूटकडे २५ फेब्रुवारीपर्यंत पोंचावीं अशी अपेक्षा आहे.

### खेडेगावांतील कापडाचें वाटप

मुंबई सरकारनें खेड्यांत शहराप्रमाणें कापडाचें वाटप करण्याची आखलेली योजना अंमलांत न आणण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें सरकारपुरस्कृत कापड दुकानदारांची पद्धतहि १ जानेवारीपासून खेड्यांतून बंद करण्यांत आली आहे.

# स्फुट विचार

## रेल्वेच्या वाढत्या दरांची पूर्वसूचना व सुखसोईचें आश्वासन

हिंदुस्थान सरकारचे वॉर ट्रॅन्सपोर्ट खात्याचे मंत्री, सर एडवर्ड बेंथॉल, ह्यांनीं १९४६–४७ चें अंदाजपत्रक असेंब्लीस सादर केलें. १९४५–४६ मध्यें एकूण उत्पन्न २२० कोटि रुपये होईल असा अंदाज होता व खर्चाची अपेक्षा १६० कोटि रुपयांची होती, परंतु उत्पन्नाचा आकडा वर्षअखेर २२५ कोटींवर जाईल, अशी अपेक्षा आहे. खर्चाह १६९ कोटि, ३० लक्ष रुपये होईल असा अंदाज आहे. १९४६-४७ च्या अंदाजपत्रकांत १७७ कोटि रुपयांचें उत्पन्न गृहीत धरलें असून १२५ कोटि, ७३ लक्ष रुपयांच्या खर्चाची तरतूद करण्यांत आली आहे. अशा रीतीनें १९४५-४६ च्या मानानें १९४६-४७ मध्यें उत्पन्नांत ४८ कोटींची म्हणजे २३% ची घट पडणार आहे. खर्चहि त्या प्रमाणांत कमी होणार आहे. १९४५-४६ सालीं हिंदी रेल्वेजना जेवढें उत्पन्न मिळालें, तितकें ह्यापूर्वी कधींहि मिळालें नव्हतें. इंटर व तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या सुखसोई वाढविण्याचा निश्चय करण्यांत आलेला आहे, असें दिसतें. १९४६-४७ सालीं हिंदुस्थान सरकारास रेल्वेजकडून फक्त ७ कोटि, ३६ लक्ष रुपये मिळतील. १९४५-४६ मधील ३२ कोटींच्या आकड्याचे मानानें ही रक्कम किती तरी लहान आहे. अंदाजपत्रकावर भाषण करतांना सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं रेल्वेजपुढील अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांचा उल्लेख केला, परंतु त्या सर्वांत रेल्वेचे दर वाढविण्याच्या आवश्यकतेबद्दल त्यांनीं दिलेली पूर्व-सूचना अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें रेल्वे दरांत २०% तें २५% वाढ करावी लागणार आहे, असें सांगून चालू वर्षी तरी तसें करण्याची आपणांवर पाळी आलेली नाहीं ह्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें रेल्वेच्या वाढत्या दरांची कडू गोळी सुखसोईंच्या आश्वासनानें गुंडित केलेली आहे, असें एकंदरींत दिसून येतें.

## रेशनमधील कपातीमुळें गंभीर दुष्काळ निश्चित टळेलच, असें नाहीं

मुंबईच्या गव्हर्नरांचे सल्लागार, सर हेन्री नाईट, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत पत्रकारांचे बैठकींत आपल्या प्रांतांतील अन्नपरिस्थितीसंबंधीं माहिती सांगितली. मुंबई प्रांतांतील सात जिल्ह्यांमधील बहुतेक पिकें बुडाल्याकारणानें दुष्काळाची आपत्ति ओढवली आहे, असें त्यांनीं सांगितलें. चालू वर्षासाठी प्रांतास १३,०५,००० टन धान्य हवें आहे. परंतु बाहेरून आणलेलें व प्रांतांतच जमा केलेलें धान्य ह्यांचा एकूण पुरवठा १०,९९००० टनांपलीकडे जाणार नाहीं, असा अंदाज आहे. पंजाबमधून ७५,००० टन गहू आयात होतो, परंतु तेथील पिकांची परिस्थिति लक्षांत घेतां पंजाबचा गहू मिळेल किंवा नाहीं, हें सांगतां येत नाहीं. त्याची भरपाई इतर ठिकाणांहून गहू आणवून करतां येईल, अशा विश्वासानें ती आयात गृहीत धरण्यांत आली आहे. डिसेंबर १९४६ अखेर आणखी १,१६००० टन धान्य लागेल तें हिशेबांत धरलें म्हणजे एकूण तूट ३,२३,००० टनांवर जाते, असे आकडे सर हेन्री ह्यांनीं सांगितले. ह्यावर उपाययोजना म्हणून पूर्वी दर माणशीं एक पौंड धान्य रेशन देण्यांत येत असें, त्यांत २५% कपात करण्यांत आली आहे. म्हणजे, तें पाऊण पौंड झालें आहे. ही कपात केली, तरी धान्याचा प्रत्यक्ष उठाव २५% कमी होणार नाहीं, असें सर हेन्री ह्यांनीं सांगितलें. रेशनमधील कपातीमुळें दुष्काळ टळण्यास बरीच मदत होईल, तो नक्की टळेलच असें नाहीं, हें त्यांनीं स्पष्ट केलें. पुरवठा कमी पडला, तर वरील अंदाज खोटे ठरणार आहेत. त्याप्रमाणें, लोकांनीं कल्पनेपेक्षा रेशन जास्त घेतलें, तरी हिशेबावर त्याचा परिणाम होणार आहे. जेथें पिकें बुडालीं आहेत, तेथील लोक व इतर ठिकाणचे लोक ह्या सर्वांना सारखेंच धान्य मिळावें, भेदाभेद होऊं नये, ह्या तत्त्वावर मुंबई सरकारची अन्नयोजना आधारलेली आहे. मुंबई प्रांताचे गव्हर्नर, सर जॉन कॉलव्हील, ह्यांनीं मुंबईच्या नभोवाणीवरून भाषण करून, लोकांनीं सरकारशीं सहकार्य केल्यास ह्या प्रांतांत आवाक्याबाहेर दुष्काळ पसरेल अशी कोणासहि भीति वाटण्याचें कारण नाहीं, असें आश्वासन दिलें. अन्नाचा प्रत्येक कण कारणीं लावला पाहिजे, असें सांगून आपल्या स्वतःच्या "गव्हर्नमेंट हाउस"मध्येंहि रेशनमधील धान्य शक्य तेवढें कमी उपयोगांत आणलें जाण्याची दक्षता बाळगण्यांत येत आहे, असें ते म्हणाले.

## कोऑपरेटिव्ह बँकिंग

(मुंबई को. बँक्स असोसिएशनचें बातमीपत्र)

आपल्या सभासदांनीं पुरविलेली आंकडेवार व इतर माहिती प्रसिद्ध करणें आणि सभासद-बँकांच्या मार्गदर्शनासाठी वेळोवेळ बुलेटिन्स काढणें, हा सहकारी बँक्स असोसिएशनचा एक उद्देश आहे. सहकारी बँकांचे त्रैमासिक हिशेब मागें मुंबई सरकारच्या गॅझेटांत छापले जात असत. तें बंद झाल्यावर असोसिएशनच्या एक्झिक्युटिव्ह कमिटीनें ते हिशेब, पद्धत सुधारून, बॉबे को. क्वार्टर्लीमध्यें प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला; परंतु कागदाच्या तुटवड्यामुळें क्वार्टर्लीच्या चालकांस त्यांच्या प्रसिद्धीस जागा देणें अशक्य झालें. तेव्हां, एक्झिक्यूटिव्ह कमिटीनें स्वतःचें एक "बातमीपत्र" काढण्यास प्रारंभ केला आहे. तें प्रत्येक तिमाहीस प्रसिद्ध होईल. त्यांत सहकारी बँकांचे हिशेबाचे तक्ते, इतर उपयुक्त माहिती, बोर्ड्स ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज आणि एक्झिक्यूटिव्ह कमिटी ह्यांच्या सभांचे वृत्तांत, सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारशीं झालेल्या पत्रव्यवहाराचे उतारे, वगैरे देण्यांत येतील. प्रस्तुत न्यूज लेटर, सहकारी बँकांनाच नव्हे तर सर्व सहकारी कार्यकर्त्यांना उपयुक्त व्हावें अशी एक्झिक्यूटिव्ह कमिटीची अपेक्षा आहे. न्यूज लेटरचा पहिला अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे. असोसिएशनच्या सभासदांना बातमीपत्र मोफत पाठविलें जाईल.

## मोगलाईतील धान्य बँकांची प्रगति

मि. जमील हुसेन, रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायट्या, यांनीं वाचलेल्या रिपोर्टावरून एकंदर संस्थानांत ३,९७१ धान्य बँका स्थापन झाल्याचें दिसून आलें. त्याचप्रमाणें ९९ तालुक्यांत को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट युनिअन्स स्थापन झाल्या. यापैकीं दिवाणखालसा इलाख्यांत चार असून त्या अनुक्रमें कोपवळ, पेद्दापल्ली, तांडूर व वनापर्ती येथें आहेत. या युनिअन्सचें संकलित भांडवल १,९८,००,००० रुपये असून त्यापैकीं ५५,५०,००० रु. वसूल झाले आहेत. जिल्ह्याबाहेर निर्यात केलेल्या मालावर कमिशन रूपानें युनिअन्सना ४० लाख रुपये फायदा झाला. याचा उपयोग शेती व धंदा सुधारण्याकडे करण्यांत येईल. मि. जमील हुसेन यांनीं हैद्राबाद शहरासाठी कंझूमर्स युनिअनची योजना आखली असून त्याच्या शाखा निरनिराळ्या मोहोल्यांतून स्थापण्यांत येतील.

# मुंबई शेतकरी कर्जदारांना मदत देण्यासंबंधी कायदा

## कांहीं वादग्रस्त मुद्यांचें विवेचन

( लेखक:—श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, सातारा )

मुंबई सरकारने १९३९ साली प्रांतांतील कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी व पर्यायानें त्यांचीं कर्जें त्यांच्या ऐपतीप्रमाणें देण्यास त्यांना सवड मिळावी म्हणून कर्जें कमी करण्याच्या हेतूने एक कायदा केला आहे, तो कायदा १९३९ चा २८ वा होय. त्या कायद्यामध्यें पुन्हां कांहीं दुरुस्त्या झाल्या व बरेच महत्त्वाचे फेरफार १९४५ च्या ८ व्या कायद्याने झालेले आहेत. आतां हा दुरुस्त केलेला कायदाच प्रत्येक जिल्ह्यांतील कांहीं तालुक्यांमधून प्रयोगादाखल सुरू केला आहे. हा कायदा करितांना पुष्कळ घाई झाली असावी असें वाटतें. कायद्यांतील शब्दयोजना व्यवस्थित नाहीं. त्यामुळें पुष्कळ वेळां कायद्याच्या कलमांच्या अर्थाविषयीं संदेह उत्पन्न होतो. ह्या कायद्याचा संबंध देशांतील अज्ञ जनतेशींच यावयाचा आहे, सबब कांहीं वादग्रस्त मुद्यांचा विचार ह्या लेखांत करण्याचा प्रयत्न केला आहे

१. कायद्याच्या कलम २ (५) मध्यें "कर्ज" ह्या शब्दाची व्याख्या दिली आहे व त्यामध्यें "कर्ज" या शब्दाचा अर्थ कर्जदाराकडून नाण्याच्या किंवा मालाच्या रूपाने येणें झालेली पात्रता ( liability ) असा दिला आहे. यावरून बोर्डाकडे अर्ज करतेवेळींच ही पात्रता असली पाहिजे. ह्याचा अर्थ त्यावेळेस जर एखादें देणें पात्र ( due ) झालें नसेल तर बोर्डाला त्या देण्याचा विचार करितां येणार नाहीं. उदाहरणार्थ एखाद्या हुकूमनाम्यानें हप्ते दिले आहेत तर १९४७, किंवा त्यापुढील वर्षामध्यें येणें होणाऱ्या हप्त्याचा विचार अर्जदाराच्या कर्जाचा विचार करितांना बोर्डास करितां येईल कीं नाहीं हा वादग्रस्त प्रश्न आहे. तसेंच तारण गहाण दस्ताची मुदत १९४७ नंतर संपते तरी अशा दस्तांतील कर्जाचा विचारही बोर्डास करितां येणार नाहीं, मग कर्जदाराच्या सर्व कर्जाचा विचार करून त्याचे त्यांच्या ऐपतीप्रमाणें हप्ते कसे ठरविणार ? सारांश ( Debt due ) ह्या शब्दाचा हा जो अर्थ होत आहे त्याची कल्पना कायदा करणारांनाही झाली नसावी.

२. कर्ज तडजोड करण्याकरितां नेमिलेलीं बोर्डें हीं 'कोर्ट' नाहींत व त्यामुळें त्यांनीं केलेले कोणतेही हुकूम हे हायकोर्टाचे तपासणीचे कक्षेंत येत नाहींत. त्यांच्यावर हायकोर्टाची हुकमत चालत नाहीं. ( ४७ मुंबई लॉ रिपोर्टर ८५० पान पहा. ) ह्या कायद्याखालीं बोर्डानें केलेल्या निवाड्याविरुद्ध अगर निर्णयाविरुद्ध अपील फक्त अत्यंत मर्यादित क्षेत्रांतच ठेविलें आहे. कायद्याच्या १२ व्या कलमान्वयें निवाडा अयोग्य रीतीनें मिळविला असेल किंवा बोर्डाच्या सभासदानें लांच स्वीकारली किंवा गैरवर्तन केलें असेल वगैरे कांहीं मर्यादित बाबींमध्येंच अपील होऊं शकतें. ज्याप्रमाणें स्थानिक संस्थांच्या निवडणुकीच्या तक्रारीसंबंधीं कोर्ट हें वैयक्तिक कोर्ट असतें ( Persona Designate ), त्यांच्या निकालावर कोठेंहि अपील चालत नाहीं. जवळ जवळ तशीच परिस्थिति कायद्यानें ह्या तडजोड बोर्डाची केलेली आहे. पुष्कळ वेळां त्यांचे निकाल हे निर्णयात्मक होतील. फर्स्ट क्लास सबजज्जानें केलेल्या कोणत्याहि निकालाविरुद्ध डिस्ट्रिक्ट कोर्ट व हायकोर्ट यांच्याकडे अपील किंवा निदान तपासणी अर्ज तरी चालूं शकतो. बोर्डाच्या निकालाविरुद्धहि तशा प्रकारची दाद मागण्याचा हक्क अर्जदारांना असणें जरूर आहे व या दृष्टीनें कायद्यामध्यें कांहीं तरतूद त्वरित होणें इष्ट आहे.

३. कलम १८ प्रमाणें बोर्डाकडे करावयाचे अर्ज हे "जणू काय हिशेबांतील दाव्यांतील फिर्याद" आहे असें समजून त्यावर कोर्ट फीचा स्टँप द्यावयाचा आहे. म्हणजे हल्लींच्या कायद्यानें आठ आण्याचा कोर्ट फी स्टँप अर्जास लावावयाचा आहे. पुढें प्रश्न असा आहे कीं, मध्यंतरीं अज्ञान हरकतदाराचे पालक नेमणें किंवा पुनः पत्ता देणें वगैरेसंबंधीं जे अर्ज करावयाचे असतात अशा अर्जास किती कोर्ट फी यावयाची ? कांहीं बोर्डांच्या मतानें अशा अर्जांना तीन आण्याची कोर्ट फी पुरेशी आहे. कारण त्यांच्या पुढील अर्ज हे हिशोबांतील फिर्यादीसारखे समजावयाचे. कांहीं बोर्डांच्या मतानें फक्त कलम १७ प्रमाणें करावयाचे अर्जच फक्त हिशोबाच्या दाव्यांतील फिर्यादीसारखे समजावयाचे नाहींत, तर नेहमीच्या फिर्यादीप्रमाणें ते अर्ज समजावयाचे व अशा कामांतील मध्यंतरींच्या अर्जाप्रमाणें ह्या अर्जांना दहा आण्याचें तिकीट लावलें पाहिजे. या बाबतींत आणखी एक मत आहे. जर बोर्ड हें कोर्ट होत नाहीं तर मग ह्या मध्यंतरीं दिलेल्या अर्जांना अजिबात कोर्ट फी उपयोगीच नाहीं. कारण वस्तुतः बोर्ड हीं लवादाप्रमाणें आहेत व लवादापुढील कामांत दिलेल्या अर्जांना तिकीट लावावें लागत नाहीं, अशा प्रकारें ह्या मुद्यावर निरनिराळीं मतें आहेत तरी ह्या बाबतींत अधिकारयुक्त निवेदन होणें जरूर आहे.

( अपूर्ण )


# NOTICE

**The Presidency Industrial Bank, Ltd., Poona**

Notice is hereby given that the Ninth Ordinary General Meeting of the Share-holders of the Presidency Industrial Bank, Ltd., Poona, will be held at the registered office of the Bank on Sunday the 10th March 1946 at 5 p. m. to transact the following business :—

1. To receive and consider the Profit and Loss Account, the Balance Sheet and the Report of the Directors and Auditors for the year ending 31st December 1945.
2. To declare a Dividend.
3. To elect three Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election. Messrs. G. R. Sathe, D. G. Bapat and S. M. Joshi, retire and offer themselves for re-election. Mr. M. M. Gadre, co-opted Director, also retires.
4. To appoint Auditors and to fix their remuneration.
5. To confirm the donation of Rs. 101 given by us to The Maratha Chamber of Commerce and Industries for the Ogale Memorial.
6. To transact any other business as may be allowed by the Chairman.

Poona City,
15-2-46.

By order,
C. T. Chitale,
*Managing Director.*

# मुंबई शेअर बाजार

वर्ग पुस्तकें बंद

फिनलेमिल्स १६–२–४६ ते ८–३–४६

गोकाक मिल्स १–३–४६ } २१–३–४६ } ( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

अपोलो मिल्स १–३–४६ ते २३–३–४६

व्याज–वजा

फिनले मिल्स रु. १५ दि. १४–३–४६

कोहिनूर मिल्स } सेंट्रल बँक } २२–२–४६ ते १६–३–४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार १८।२।४६ | मंगळवार १९।२।४६ | बुधवार २०।२।४६ | गुरुवार २१।२।४६ | शुक्रवार २२।२।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २८४२—८ | २८००—० | २८९६—४ | २८१५—० | बाजार बंद : कस्तुरबा–दिन |
| ४८०; ३७२ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४९२—८ | ४९२—८ | ४८४—८ | ४८३—० | |
| २२२२-८; १७९३-१२ | २५–०–०† | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २२२२—८ | २१९२—८ | २२०७—८ | २१९५—० | |
| ७०२; ५६६ | ९–०–०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६८४—० | ६७३—० | ६७४—० | ६७०—८ | |
| ६६८; ५०७ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ७०२—० | ६८३—८ | ६८२—० | ६७५—० | |
| ४४३–८; ३६० | ९–०–०S | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ४४८—० | ४४१—० | ४४२—८ | ४४४—० | |
| ३४२–०; २७५ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ३३७—० | ३३७—० | ३३२—० | ३३१—८ | |
| ३३५; २८३-८ | ५–०–०† | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३४०—० | ३३५—० | ३३८—० | ३३३—० | |
| ३३७; २४३ | ४–०–०† | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३४०—० | ३३५—० | ३३५—८ | ३३३—० | |
| ५; ३-११-० | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ४–१४–० | ४–१३–६ | ४–१३–६ | ४–१३–६ | |
| १७ १०; १३-७-० | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १७—१३ | १७—८ | १७–४–६ | १७—५ | |
| ३-१०; २-९ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३—८—६ | ३—७—६ | ३—७—६ | ३—७—६ | |
| ७९०; ६४५ | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७५०—० | ७४०—० | ७४०—० | ७३८–१२ | |
| २४३–८; २०६-८ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३९—८ | २३६—० | २३५—८ | २३५—८ | |
| २५६; २१३-८ | ८–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २४९—० | २४८—० | २४६—० | २४६—८ | |
| ५९२-८; ५१०-० | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६२२—८ | ६१७—८ | ६१७—८ | ६१३–१२ | |
| ४३-७; ३०-१२ | १–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४३—१३ | ४३—५ | ४३—८ | ४३—५ | |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३—४ | १०३—४ | १०३–१–० | १०२–१५ | |

सोमवार दि. ४–२–४६ पासून बाजार दुपारीं १२ ते १॥ पर्यंत चालू आहे. सोमवार, दि. २५ लीं बाजार बंद होता.

## चलनविषयक ऑर्डिनन्सचे उद्देश

( हिंदुस्थानचे फडणीस सर आर्चिबाल्ड रोलंड्सकृत खुलासा )

( १ ) काळा बाजार करणारांवर आघात.

( २ ) कर चुकविणारांस पकडणें.

( ३ ) नोकरांनीं वाममार्गानें मिळविलेले पैसे त्यांस पचूं न देणें व कांहींस पकडणें.

( ४ ) शेअर्समध्यें पैसे खरोखर ज्यांस गुंतविण्याचे आहेत, अशांना बाधक होणाऱ्या कारवाया थांबविणें.

( ५ ) योग्य चलनविषयक धोरणास पुढें मागें अपायकारक होणारी गोष्ट नियंत्रणाखालीं आणणें.

( ६ ) आतां युद्ध संपलें आहे, तेव्हां सट्टेबाज, काळाबाजारवाले, लांच देणारे व खाणारे इत्यादींवर कडक उपाययोजना सरकार करणार आहे, ह्या उद्देशाची प्रसिद्धी.

( ७ ) सांठविलेला पैसा उत्पादक कार्याकडे उपयोगी लावतां आला तर पहाणें.

( ८ ) आंकड्यांविषयीं हिंदुस्थान मागसलेला आहे, तेव्हां माहितीचे आंकडे गोळा करण्यास मदत करणें.

## पुणें सें. को. बँकेच्या मंचर शाखा बँकेचा उद्घाटन समारंभ

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मंचर (तालुका आंबेगांव) येथील नवीन शाखेचा उद्घाटन समारंभ शनिवार दि. ९ ला प्रि. घ. रा. गाडगीळ यांच्या हस्तें मोठ्या थाटानें पार पडला.

प्रि. घ. रा. गाडगीळ यांनीं आपल्या भाषणांत नवीन शाखेचें औपचारिक रीतीनें उद्घाटन केल्याचें जाहीर केलें व युद्धकाळांत सहकारी चळवळीनें केलेली कामगिरी, शेतकऱ्यांनीं निष्कर्जी असण्याबद्दल करावयाचे प्रयत्न व सहकारी चळवळीवर निष्ठा ठेवून कार्य करण्याची आवश्यकता या मुद्यांचें विवेचन केलें.

## "पैसा कसा गुंतवावा ?"

वरील विषयावर " अर्था " चे संपादक, श्री. श्रीपाद वामन काळे, ह्यांचें मुंबई नभोवाणीवर मंगळवार ता. ५ मार्च व मंगळवार ता. १२ मार्च ह्या दोन दिवशीं रात्रीं ८ वाजतां भाषण होणार आहे.

## हिंदी रेल्वेजचा उत्पन्न–खर्च

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | एकूण उत्पन्न | व्यवस्था खर्च | निव्वळ वाढावा |
|---|---|---|---|
| १९४४–४५ ( प्रत्यक्ष ) | २१६·३८ | १४२·२८ | ४८·८९ |
| १९४५–४६ (दुरुस्त अंदाज) | २२५ | १६९·३ | ३२·०७ |
| १९४६–४७ ( अंदाज ) | १७७ | १२५·७३ | १२·२२ |

सूचना:–वाढाव्याची रक्कम काढतांना व्यवस्थेच्या खर्चाखेरीज इतरही कांहीं खर्चाच्या बाबी उत्पन्नांतून वजा केलेल्या असतात.

## दि पूना अर्बन को. बँक लि.

दि पूना अर्बन को. क्रे. सोसायटी लि. पुणें ह्या संस्थेचें वरील नांवाच्या बँकेंत रुपांतर झालें. त्याचा समारंभ श्री. दा. वि. गोखले ह्यांच्या अध्यक्षतेखालीं रविवार ता. २४ रोजीं साजरा झाला. अर्बन बँकांपुढील प्रश्नांवर त्यावेळीं रावसाहेब खोले, श्री. दा. वा. पोतदार, ऑडिटर श्री. गोखले, इत्यादींचीं भाषणें झालीं.


–दररोज वापरण्यासाठीं लागणारें–

लोणी आणि चक्का

खात्रीलायकपणें मिळण्याचें पुण्यांतील

—प्रमुख ठिकाण—

बेडेकर ब्रदर्स, पुणें, ८६७ सदाशिव पेठ, पुणें.

# मुंबई शेतकरी कर्जदारांना मदत देण्यासंबंधी कायदा

## कांहीं वादग्रस्त मुद्यांचें विवेचन

( लेखक:—श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, सातारा )

मुंबई सरकारने १९३९ सालीं प्रांतांतील कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी व पर्यायानें त्यांचीं कर्जें त्यांच्या ऐपतीप्रमाणें देण्यास त्यांना सवड मिळावी म्हणून कर्जें कमी करण्याच्या हेतूने एक कायदा केला आहे, तो कायदा १९३९ चा २८ वा होय. त्या कायद्यामध्यें पुन्हां कांहीं दुरुस्त्या झाल्या व बरेच महत्त्वाचे फेरफार १९४५ च्या ८ व्या कायद्याने झालेले आहेत. आतां हा दुरुस्त केलेला कायदाच प्रत्येक जिल्ह्यांतील कांहीं तालुक्यांमधून प्रयोगादाखल सुरू केला आहे. हा कायदा करितांना पुष्कळ घाई झाली असावी असें वाटतें. कायद्यांतील शब्दयोजना व्यवस्थित नाहीं. त्यामुळें पुष्कळ वेळां कायद्याच्या कलमांच्या अर्थाविषयीं संदेह उत्पन्न होतो. ह्या कायद्याचा संबंध देशांतील अज्ञ जनतेशींच यावयाचा आहे, सबब कांहीं वादग्रस्त मुद्यांचा विचार ह्या लेखांत करण्याचा प्रयत्न केला आहे

१. कायद्याच्या कलम २ (५) मध्यें "कर्ज" ह्या शब्दाची व्याख्या दिली आहे व त्यामध्यें "कर्ज" या शब्दाचा अर्थ कर्जदाराकडून नाण्याच्या किंवा मालाच्या रूपाने येणें झालेली पात्रता ( liability ) असा दिला आहे. यावरून बोर्डाकडे अर्ज करतेवेळींच ही पात्रता असली पाहिजे. ह्याचा अर्थ त्यावेळेस जर एखादें देणें पात्र ( due ) झालें नसेल तर बोर्डाला त्या देण्याचा विचार करितां येणार नाहीं. उदाहरणार्थ एखाद्या हुकूमनाम्यानें हप्ते दिले आहेत तर १९४७, किंवा त्यापुढील वर्षामध्यें येणें होणाऱ्या हप्त्याचा विचार अर्जदाराच्या कर्जाचा विचार करितांना बोर्डास करितां येईल कीं नाहीं हा वादग्रस्त प्रश्न आहे. तसेंच तारण गहाण दस्ताची मुदत १९४७ नंतर संपते तरी अशा दस्तांतील कर्जाचा विचारही बोर्डास करितां येणार नाहीं, मग कर्जदाराच्या सर्व कर्जाचा विचार करून त्याचे त्यांच्या ऐपतीप्रमाणें हप्ते कसे ठरविणार ? सारांश ( Debt due ) ह्या शब्दाचा हा जो अर्थ होत आहे त्याची कल्पना कायदा करणारांनाही झाली नसावी.

२. कर्ज तडजोड करण्याकरितां नेमिलेलीं बोर्डें हीं 'कोर्ट' नाहींत व त्यामुळें त्यांनीं केलेले कोणतेही हुकूम हे हायकोर्टाचे तपासणीचे कक्षेंत येत नाहींत. त्यांच्यावर हायकोर्टाची हुकमत चालत नाहीं. ( ४७ मुंबई लॉ रिपोर्टर ८५० पान पहा. ) ह्या कायद्याखाली बोर्डानें केलेल्या निवाड्याविरुद्ध अगर निर्णयाविरुद्ध अपील फक्त अत्यंत मर्यादित क्षेत्रांतच ठेविलें आहे. कायद्याच्या १२ व्या कलमान्वयें निवाडा अयोग्य रीतीनें मिळविला असेल किंवा बोर्डाच्या सभासदानें लांच स्वीकारली किंवा गैरवर्तन केलें असेल वगैरे कांहीं मर्यादित बाबीमध्येंच अपील होऊं शकतें. ज्याप्रमाणें स्थानिक संस्थांच्या निवडणुकीच्या तक्रारीसंबंधीं कोर्ट हें वैयक्तिक कोर्ट असतें ( Persona Designate ), त्यांच्या निकालावर कोठेंहि अपील चालत नाहीं. जवळ जवळ तशीच परिस्थिति कायद्याने ह्या तडजोड बोर्डाची केलेली आहे, पुष्कळ वेळां त्यांचे निकाल हे निर्णयात्मक होतील. फर्स्ट क्लास सबजज्जानें केलेल्या कोणत्याहि निकालाविरुद्ध डिस्ट्रिक्ट कोर्ट व हायकोर्ट यांच्याकडे अपील किंवा निदान तपासणी अर्ज तरी चालूं शकतो. बोर्डाच्या निकालाविरुद्धहि तशा प्रकारची दाद मागण्याचा हक्क अर्जदारांना असणें जरूर आहे व या दृष्टीनें कायद्यामध्यें कांहीं तरतूद त्वरित होणें इष्ट आहे.

३. कलम १८ प्रमाणें बोर्डाकडे करावयाचे अर्ज हे "जणू काय हिशेबांतील दाव्यांतील फिर्याद" आहे असें समजून त्यावर कोर्ट फीचा. स्टँप द्यावयाचा आहे. म्हणजे हल्लींच्या कायद्यानें आठ आण्याचा कोर्ट फी स्टँप अर्जास लावावयाचा आहे. पुढें प्रश्न असा आहे कीं, मध्यंतरीं अज्ञान हरकतदाराचे पालक नेमणें किंवा पुन: पत्ता देणें वगैरेसंबंधीं जे अर्ज करावयाचे असतात अशा अर्जास किती कोर्ट फी द्यावयाची ? कांहीं बोर्डाच्या मतानें अशा अर्जांना तीन आण्याची कोर्ट फी पुरेशी आहे. कारण त्यांच्या पुढील अर्ज हे हिशोबांतील फिर्यादीसारखे समजावयाचे. कांहीं बोर्डाच्या मतानें फक्त कलम १७ प्रमाणें करावयाचे अर्जच फक्त हिशोबाच्या दाव्यांतील फिर्यादीसारखे समजावयाचे नाहींत, तर नेहमीच्या फिर्यादीप्रमाणें ते अर्ज समजावयाचे व अशा कामांतील मध्यंतरींच्या अर्जाप्रमाणें ह्या अर्जांना दहा आण्याचें तिकीट लावलें पाहिजे. या बाबतींत आणखी एक मत आहे. जर बोर्ड हें कोर्ट होत नाहीं तर मग ह्या मध्यंतरीं दिलेल्या अर्जांना अजिबात कोर्ट फी उपयोगीच. नाहीं. कारण वस्तुतः बोर्ड हीं लवादाप्रमाणें आहेत व लवादापुढील कामांत दिलेल्या अर्जांना तिकीट लावावें लागत नाहीं, अशा प्रकारें ह्या मुद्यावर निरनिराळीं मतें आहेत तरी ह्या बाबतींत अधिकारयुक्त निवेदन होणें जरूर आहे.

( अपूर्ण )


# NOTICE

**The Presidency Industrial Bank, Ltd., Poona**

Notice is hereby given that the Ninth Ordinary General Meeting of the Share-holders of the Presidency Industrial Bank, Ltd., Poona, will be held at the registered office of the Bank on Sunday the 10th March 1946 at 5 p. m. to transact the following business :—

1. To receive and consider the Profit and Loss Account, the Balance Sheet and the Report of the Directors and Auditors for the year ending 31st December 1945.
2. To declare a Dividend.
3. To elect three Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election. Messrs. G. R. Sathe, D. G. Bapat and S. M. Joshi, retire and offer themselves for re-election. Mr. M. M. Gadre, co-opted Director, also retires.
4. To appoint Auditors and to fix their remuneration.
5. To confirm the donation of Rs. 101 given by us to The Maratha Chamber of Commerce and Industries for the Ogale Memorial.
6. To transact any other business as may be allowed by the Chairman.

By order,
C. T. Chitale,
*Managing Director.*

Poona City,
15-2-46.

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

वर्ग पुस्तकें बंद

फिनलेमिल्स १६-२-४६ ते ८-३-४६

गोकाक मिल्स १-३-४६ }
२१-३-४६ }

अपोलो मिल्स १-३-४६ ते २३-३-४६

व्याज-वजा

फिनले मिल्स रु. १५ दि. १४-३-४६

कोहिनूर मिल्स }
सेंट्रल बँक } २२-२-४६ ते १६-३-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार १८।२।४६ | मंगळवार १९।२।४६ | बुधवार २०।२।४६ | गुरुवार २१।२।४६ | शुक्रवार २२।२।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २८४२—८ | २८००—० | २८९६—४ | २८९५—० | बाजार बंद : कस्तुरबा-दिन |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४९२—८ | ४९२—८ | ४८४—८ | ४८३—० | |
| २२२२-८; १७६३-१२ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २२२२—८ | २१९२—८ | २२०७—८ | २१९५—० | |
| ७०२; ५६६ | ९-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६८४—० | ६७३—० | ६७४—० | ६७०—८ | |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ७०२—० | ६८३—८ | ६८२—० | ६७५—० | |
| ४४३-८; ३६० | ९-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ४४८—० | ४४१—० | ४४२—८ | ४४४—० | |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३३७—० | ३३७—० | ३३२—० | ३३१—८ | |
| ३३५; २८३-८ | ५-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३४०—० | ३३५—० | ३३८—० | ३३३—० | |
| ३३७; २४३ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३४०—० | ३३५—८ | ३३५—८ | ३३३—० | |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-१४-० | ४-१३-६ | ४-१३-६ | ४-१३-६ | |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १७—१३ | १७—८ | १७-४-६ | १७—५ | |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३—८—६ | ३—७—६ | ३—७—६ | ३—७—६ | |
| ७९०; ६४५ | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७५०—० | ७४०—० | ७४०—० | ७३८-१२ | |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३९—८ | २३६—० | २३५—८ | २३५—८ | |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २४९—० | २४८—० | २४६—० | २४६—८ | |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६२२—८ | ६१७—८ | ६१७—८ | ६१३-१२ | |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४३—१३ | ४३—५ | ४३—८ | ४३—५ | |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३—४ | १०३—४ | १०३-१-० | १०२-१५ | |

सोमवार दि. ४-२-४६ पासून बाजार दुपारीं १२ ते १॥ पर्यंत चालू आहे. सोमवार, दि. २५ लीं बाजार बंद होता.

### चलनविषयक ऑर्डिनन्सचे उद्देश

( हिंदुस्थानचे फडणीस सर आर्चिबाल्ड रोलंड्सकृत खुलासा )

( १ ) काळा बाजार करणारांवर आघात.

( २ ) कर चुकविणारांस पकडणें.

( ३ ) नोकरांनीं वाममार्गानें मिळविलेले पैसे त्यांस पचूं न देणें व कांहींस पकडणें.

( ४ ) शेअर्समध्यें पैसे खरोखर ज्यांस गुंतविण्याचे आहेत, अशांना बाधक होणाऱ्या कारवाया थांबविणें.

( ५ ) योग्य चलनविषयक धोरणास पुढें मागें अपायकारक होणारी गोष्ट नियंत्रणाखालीं आणणें.

( ६ ) आतां युद्ध संपलें आहे, तेव्हां सट्टेबाज, काळाबाजारवाले, लांच देणारे व खाणारे इत्यादींवर कडक उपाययोजना सरकार करणार आहे, ह्या उद्देशाची प्रसिद्धी.

( ७ ) सांठविलेला पैसा उत्पादक कार्याकडे उपयोगी लावतां आला तर पहाणें.

( ८ ) आंकड्यांविषयीं हिंदुस्थान मागसलेला आहे; तेव्हां माहितीचे आंकडे गोळा करण्यास मदत करणें.

### पुणें सें. को. बँकेच्या मंचर शाखा बँकेचा उद्घाटन समारंभ

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मंचर (तालुका आंबेगांव) येथील नवीन शाखेचा उद्घाटन समारंभ शनिवार दि. ९ ला प्रि. ध. रा. गाडगीळ यांच्या हस्तें मोठ्या थाटानें पार पडला.

प्रि. ध. रा. गाडगीळ यांनीं आपल्या भाषणांत नवीन शाखेचें औपचारिक रीतीनें उद्घाटन केल्याचें जाहीर केलें व युद्धकाळांत सहकारी चळवळीनें केलेली कामगिरी, शेतकऱ्यांनीं निष्कर्जी असण्याबद्दल करावयाचे प्रयत्न व सहकारी चळवळीवर निष्ठा ठेवून कार्य करण्याची आवश्यकता या मुद्यांचे विवेचन केलें.

### "पैसा कसा गुंतवावा ?"

वरील विषयावर "अर्थ" चे संपादक, श्री. श्रीपाद वामन काळे, ह्यांचें मुंबई नभोवाणीवर मंगळवार ता. ५ मार्च व मंगळवार ता. १२ मार्च ह्या दोन दिवशीं रात्रीं ८ वाजतां भाषण होणार आहे.

### हिंदी रेल्वेजचा उत्पन्न-खर्च

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | एकूण उत्पन्न | व्यवस्था खर्च | निव्वळ वाढावा |
|---|---|---|---|
| १९४४-४५ ( प्रत्यक्ष ) | २१६·३८ | १४२·२८ | ४८·८९ |
| १९४५-४६ ( दुरुस्त अंदाज ) | २२५ | १६९·३ | ३२·०७ |
| १९४६-४७ ( अंदाज ) | १७७ | १२५·७३ | १२·२२ |

सूचनाः-वाढाव्याची रक्कम काढतांना व्यवस्थेच्या खर्चाखेरीज इतरही कांहीं खर्चाच्या बाबी उत्पन्नांतून वजा केलेल्या असतात.

### दि पूना अर्बन को. बँक लि.

दि पूना अर्बन को. क्रे. सोसायटी लि. पुणें ह्या संस्थेचें वरील नांवाच्या बँकेंत रुपांतर झालें. त्याचा समारंभ श्री. दा. वि. गोखले ह्यांच्या अध्यक्षतेखालीं रविवार ता. २४ रोजीं साजरा झाला. अर्बन बँकांपुढील प्रश्नांवर त्यावेळीं रावसाहेब खोले, श्री. दा. वा. पोतदार, ऑडिटर श्री. गोखले, इत्यादींचीं भाषणें झालीं.

—दररोज वापरण्यासाठीं लागणारें—
**लोणी आणि चक्का**
खात्रीलायकपणें मिळण्याचें पुण्यांतील
—प्रमुख ठिकाण—
बेडेकर ब्रदर्स, पुणें, ८६७ सदाशिव पेठ, पुणें.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानी असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बेंक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

अधिकृत भांडवल :: रु. २५,००,०००
काढलेलें भांडवल :: रु. २२,००,०००
भरलेलें भांडवल :: रु. १९,८९,५००
खेळतें भांडवल रु. ५,००,००,००० वर

……शाखा व उपशाखा……

| | |
|---|---|
| १ सातारा ( जि. सातारा ) | २४ लासलगांव (जि. नाशिक) |
| २ कऱ्हाड " | २५ मालेगांव " |
| ३ किर्लोस्करवाडी " | २६ नांदगांव " |
| ४ कोरेगांव " | २७ घोटी " |
| ५ इस्लामपूर " | २८ सटाणा " |
| ६ शिराळें " | २९ येवलें " |
| ७ तासगांव " | ३० मनमाड |
| ८ वांई " | ३१ धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ लोणंद " | ३२ दोंडाईचें " |
| १० भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ नंदुरबार " |
| ११ कल्याण " | ३४ साक्री " |
| १२ पालघर " | ३५ शहादें " |
| १३ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिरपूर " |
| १४ अहमदनगर ( " अहमदनगर ) | ३७ शिंदखेडें " |
| १५ बेलापूर रोड " | ३८ तळोदें " |
| १६ कोपरगांव " | ३९ नरढाणा |
| १७ पाथर्डी " | ४० दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १८ राहुरी " | ४१ गोध्रा " |
| १९ शेवगांव " | ४२ झालोद " |
| २० वांबोरी " | ४३ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २१ बेलापूर (गांव) " | ४४ नाडियाद ( जि. खेडा ) |
| २३ विरमगांव (जि. अहमदाबाद) | ४५ आनंद " |
| २[illegible] नाशिक ( जि. नाशिक ) | ४६ बोरसाड " |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.



ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक

## ओलक शिवण्याचीं यंत्रें

रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.

लिहा अगर भेटा:—व्ही. आर. बापट,
ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ,
लक्ष्मीरोड, पुणें नं. २



## बिनचूकच्या माहितीनें

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.

—— : स्टॉकिस्ट पाहिजेत : ——



## पैसा आणि ज्ञान वाढवा !


श्रीमंत कसें व्हावें ?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.

—आजच लिहा—

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.



## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७३८२



लहान मुलांकरितां

## आको

गोड —एरंडेल— वापरा

: लक्ष्मी एजन्सी :
मंगळवार पेठ, कोल्हापूर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.